

# मातीतले ‘मोती’

आदिवासी विकास भवन, नाशिक

मातीतले 'मोती'
Matitle ' Moti '

प्रकाशक
आदिवासी विकास भवन,नाशिक.

संपादक
सोनाली पोंक्षे
आयुक्त आदिवासी विकास भवन,नाशिक

अशोक लोखंडे
अपर आयुक्त, आदिवासी विकास भवन,नाशिक

संदीप गोलाईत
उपायुक्त, आदिवासी विकास भवन,नाशिक.

छायाचित्र
अजिजखान पठाण,नाशिक.


प्रकाशन सहकार्य
अभिव्यक्ती,
नाशिक

शब्दांकन
वंदना अत्रे,नाशिक

ले-आऊट
साई आर्टस् एन्टरप्रायजेस

मुखपृष्ठ संकल्पना
दिनेश पैठणकर,नाशिक.

आवृत्ती : प्रथम, आक्टोबर २०१५



# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| डॉक्टरकीकडून प्रशासनाच्या दिशेने... | ५ |
| स्वप्नपूर्ती... | ८ |
| ऋणमुक्त होण्यासाठी... | ११ |
| स्त्री शिकली, शहाणी झाली... | १३ |
| गरज कणखर नेतृत्त्वाची... | १५ |
| देणे समाजाचे... | १७ |
| टिंब टिंब ते डॉक्टर : एक अनोखा प्रवास ... | १९ |
| आश्रमशाळा ते उपसचिव! ... | २१ |
| मदतीचे वत्सल हात... | २४ |
| यशाचा चढता आलेख... | २६ |

# कोशिश करनेवालोंकी...

आदिवासी विकास विभागातर्फे प्रकाशित होणारे हे एक वेगळ्या प्रकारचे पुस्तक आहे. ह्या आहेत आदिवासी मुला-मुलींच्या यशोगाथा, पण त्या निव्वळ त्यांच्या यशाच्या कहाण्या नाहीत तर या यशात त्यांना सतत साथ, मदतीचा हात आणि पाठीवर उमेदीची थाप देणाऱ्या विविध ठिकाणच्या आदिवासी आश्रमशाळा, वसतिगृहे यांच्या मदतीच्या नोंदीही आहेत. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन स्वतःचे आणि आपल्या कुटुंबाचे जीवन प्रगतीच्या एका वेगळ्या टप्प्यावर नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या धडपड्या मुलांना सरकार आणि त्यांच्या योजना कशा तऱ्हेने बळ देऊ शकतात ह्याचा आलेख ह्या विविध कहाण्यांमधून आपल्या समोर येतो. आयुष्य बदलण्यासाठी तीव्र इच्छा शक्तीची एक रसरशीत ठिणगी मनात सतत प्रज्वलित असावी लागतेच पण प्रगतीच्या वाटेवर जाण्यासाठी केवळ तेवढी ठिणगी पुरेशी नसते. ती विझू नये यासाठी मदत करणारी परिस्थिती पण गरजेची असते. मदतीची ती रसद पुरवण्याचे काम या आदिवासी वस्ती गृहांनी आणि तेथील शिक्षक, काळजीवाहक यांनी केले आहे. या यशस्वी माणसांमागे हे जे मदतीचे स्रोत आहेत तेही या निमित्ताने समाजासमोर यावे हा एक हेतूहि ह्या लेखनामागे आहे.

कमालीची प्रतिकूल परिस्थिती असतांना लढावे कसे ह्याचे धडे ह्या सगळ्या कहाण्या आपल्याला देतात. कुटुंबाकडून फारसा आधार, आर्थिक आणि कधीकधी मानसिक सुद्धा, नाही, छोट्या-छोट्या गोष्टी मिळवण्यासाठी होणारी प्रचंड पायपीट, शिक्षण घेता यावे म्हणून करावी लागणारी शारीरिक कष्टाची कामे हा संघर्ष जवळ-जवळ या प्रत्येकाच्या वाटयाला आला आहे. उच्च शिक्षण घेण्याची इच्छा खूप पण तिथपर्यंत जायचे कसे ही वाट मात्र ठाऊक नाही हि परिस्थिती, हे अज्ञान ह्या लढण्याची धार अधिक तीव्र करणारे होते. आपल्याला जे यश मिळवता आले नाही त्याबद्दलचा सगळा दोष परिस्थितीच्या खुंटीला अडकवून मोकळे होणे फार सोपे असते. ह्या कहाण्या त्यापेक्षा वेगळ्या आहेत. कारण त्या आपल्या यशाचे श्रेय परिस्थितीला देत आहेत आणि त्याबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त करीत आहेत. 'कोशिश करनेवालोकी कभी हार नाही होती' हे सूत्र घेऊन सतत लढत राहणाऱ्या तरुण पिढीच्या ह्या कहाण्या त्यांच्या पुढील पिढीला प्रेरणा देत राहतील असा विश्वास म्हणूनच आहे...!



# डॉक्टरकीकडून प्रशासनाच्या दिशेने..

**डॉ. योगेश भरसठ**

आदिवासी आश्रम शाळेत रोज दुपारच्या जेवणात मिळणारी अर्धी चपाती आणि अर्धी वाटी डाळ खाऊन पोट भरत नाही म्हणून शाळेतून घरी पळून जाणारा मी, आता जेव्हा तहान भूक विसरून बारा-बारा तास आय ए एस होण्यासाठी अभ्यास करत बसतो तेव्हा वाटते, कुठे पडली हि जिद्दीची ठिणगी आणि कशी? चिंचा-बोरे पाडत फिरणे, चोरून लोकांच्या गोठ्यातून शेण गोळा करणे, जमीन सारवणे या गोष्टी करता करता शाळा सरली पण याच काळात कधीतरी एकदा शाळेत आलेल्या एका आयए एस अधिकारी महिलेचा रुबाबही बघितला आणि 'मोठे' होण्याच्या स्वप्नाचे बीज खोलवर कुठेतरी रुजले. माझ्याही नकळत त्याला धुमारे फुटत गेले. मुळे घट्ट होत गेली. ज्याची मुळे जमिनीत घट्ट रुजलेली आहेत आणि ज्याच्या मनात खूप वाढण्याची स्वप्न आहेत अशा एका झाडाची गोष्ट म्हणजे माझे आयुष्य. एका छोट्या आश्रम शाळेत सुरू झालेले आणि आता जगभर फिरण्याची क्षमता असलेले..!

मी डॉ. योगेश भरसठ. फणसपाडा, पोस्ट कोपुर्ली, तालुका पेठ येथील जेमतेम ७०-७५ कुटुंब असलेल्या गावातले आमचे घर. घरात आम्ही चौघे. पंचायत समितीत शिपाई म्हणून काम करणारे वडील, घरकाम करणारी आणि शाळेचे तोंडही न बघितलेली आई, मी आणि माझा भाऊ. आम्ही शिकावे हि वडिलांची इच्छा आणि त्यासाठी घरापासून बारा किलोमीटरवर असलेल्या निरगुडे गावच्या आश्रमशाळेत त्यांनी आम्हाला टाकले. दोन भाऊ मिळून एक पेटी आणि दोन ताटे एवढा ऐवज घेऊन आम्ही त्या आश्रमशाळेच्या वसतिगृहात दाखल झालो खरे, पण पहिल्या दिवशी ताटात पडलेले अन्न बघितले आणि ते बघूनच माझ्या पोटात भुकेने खड्डा पडला..! वसतिगृह किंवा शाळा चालवण्यासाठी अगदी चिमूटभर निधी मिळणाऱ्या या शाळेत मुलांना त्यांच्या यत्तेप्रमाणे किंवा वयाप्रमाणे जेवण मिळत असे. म्हणजे, पहिलीतील मुलाला अर्धी भाकरी तर चौथीतील मुलाला पूर्ण भाकरी अशा 'प्रमाणात' जेवण दिले जाई. शिवाय संध्याकाळी एकदा अर्ध्या पोळीचे जेवण झाले की पुन्हा अन्न दिसायचे ते एकदम दुसऱ्या दिवशी दुपारी बारा वाजताच! इथे सकाळपासून पोटात कावळ्यांची जणू शाळा भरलेली असायची! प्रश्न आमच्या दृष्टीने गंभीर होता मग त्यावर उत्तर शोधण्यासाठी आम्ही जंगलात जायचो आणि आंबे, चिंचा यावर हल्ला करायचो. मधाची पोळी हुडकून, जीवावर उदार होऊन त्यातील मध गोळा करून आणायचो. आणलेल्या चिंचा फोडून त्यातील चिंचोके आम्ही ठेवून घ्यायचो आणि चिंचा वर्गातील मुलींना द्यायचो. मग ते चिंचोके रात्रभर पाण्यात भिजवून खायचो. कहाणीचे तात्पर्य काय, तर शिक्षणापेक्षा पोटातील भूक कशी भागेल हाच सतत चिंतेचा विषय असायचा..! पेटीत ठेवलेली चतकोर

पोळी रात्री कोणी चोरू नये म्हणून पेटीला कुलूप लावून ते पकडून रात्री झोपत असायचो.

अशा परिस्थितीत मी बासरी आणि हार्मोनियम वाजवायला मात्र शिकत होतो. तेव्हा मंत्री असलेल्या पुष्पाताई हिरे आणि त्यांच्या बरोबर आय ए एस अधिकारी संजीवनी कुट्टी शाळेत आल्या तेव्हा त्यांनी माझी बासरी ऐकून मला मोठी शाबासकी दिली. ते कौतुकाचे दोन थेंब खूप उभारी देणारे होते बहुदा. एव्हाना शाळेला आणि त्यातील उपासमार- कष्ट याला आम्ही सरावलो होतो. शाळेच्या जमिनीसाठी शेण गोळा करताना लोकांकडून होणारी अवहेलना मनाला खट्टू करत होती आणि अशा लोकांपुढे मन ताठ करून येण्याची इच्छा दृढ होत होती. मी वर्गात नेहमी पहिला यायचो. वर्गातील बाकीची मुलं अजून आंबे-चिंचांची वाटमारी करण्यातच गुंतलेली असताना माझे लक्ष त्या पलीकडे असलेल्या जगाचा वेध घेण्याचा प्रयत्न करत होते. हा ध्यास लागल्यामुळेच असेल कदाचित, पण दहावीला मी केंद्रात पहिला आलो. शिक्षणामुळे मिळणाऱ्या सन्मानाची ती पहिली चव फार हवीहवीशी होती, तिनेच मला पुढच्या वाटेवर जाण्याचे बळ दिले आणि त्यासाठी मी नाशिकला आलो.

केटीएचएम कॉलेज मध्ये अकरावी-बारावी आणि आदिवासी विकास विभागाच्या वसतिगृहात मुक्काम, शिवाय दरमहा दोनशे रुपये भत्ता. चंगळ वाटावी अशी परिस्थिती जणू होती पण तेव्हा त्या सुखाची एवढी मात्तबरी वाटत नव्हती कारण दूरवरची वाट दिसत होती. वैद्यकीय शिक्षण घेण्याची इच्छा होती पण त्यासाठी प्रवेश परीक्षा द्यावी लागते एवढे सामान्य ज्ञान सुद्धा नव्हते. आणि त्याची माहिती मिळाली तेव्हा त्या अभ्यासाची पुस्तके नव्हती. त्या काळात हात दिला तो सार्वजनिक वाचनालयाच्या पानसे अभ्यासिकेने. बारावीत ग्रुपमध्ये ९३ टक्के मार्क मिळाल्यावर तर ही अभ्यासिका हीच जणू माझी सखी झाली. सकाळी सात ते रात्री नऊ असा, केवळ दिवसच नाही तर बरीच रात्रही मी तिथेच घालवायचो. वैद्यकीय परीक्षेच्या प्रवेश परीक्षेत मी अनुसूचित जमाती मध्ये राज्यात अकरावा आलो. पण हा निकाल मला समजायला १०-१२ दिवस लागले कारण माझ्या गावात ना फोन होता ना अशा संवादाच्या कुठल्या सुविधा. शेवटी मला शिकवणाऱ्या सी बी अहिरे सरांनी एक माणूस माझ्या घरी पाठवला. या एका निकालाने माझे आयुष्य एका वेगळ्या पातळीवर नेऊन ठेवले कारण वैद्यकीय शिक्षणाचे दरवाजे माझ्यासाठी खुले झाले, तेही पुण्यातील बी जे मेडिकल सारख्या महाविद्यालयातून..! पुण्यासारख्या शहरात शिकणे ही एक संधी होती पण ते आव्हानही होते आणि ते पेलण्यासाठी राहण्याची चांगली सोय होणे हे गरजेचे होते. समाजकल्याण खात्याच्या वसतिगृहाने हा प्रश्न सोडवला. पुस्तक, जेवण या सोयींखेरीज आम्हाला भत्ता मिळत असे. तक्रार करावी अशी कोणतीच बाब या व्यवस्थेत नव्हती फक्त एकच बाब खटकत होती आणि ती म्हणजे बीजेच्या वसतिगृहात राहणारी मुले आणि बाहेर राहणारी मुले यांच्यामध्ये असलेली एक अदृश्य दरी! ती मला अस्वस्थ करत असे पण ती भरून काढणे मात्र कधीच शक्य झाले नाही.

मी गुरांचा डॉक्टर किंवा ग्रामसेवक किंवा शिक्षक व्हावे अशी माझ्या वडिलांची इच्छा होती पण माझी स्वप्न त्या पलीकडची होती. आणि त्यासाठी घरात बंडखोरी करून, वडिलांचे न ऐकताच मी माझ्या शिक्षणासाठी निघून गेलो. एमबीबीएस झाल्यावर मला लगेच मेडिकल ऑफिसर म्हणून पेठ तालुक्यातील कुम्भाळेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात रुजू होण्याची ऑर्डर मिळाली या काळात मला डोळ्यापुढे एकच गोष्ट दिसत होती आणि ती म्हणजे माझा एमडीचा अभ्यास! केवळ एमबीबीएस होऊन स्वस्थ राहणे हे मला अजिबात मान्य नव्हते त्यामुळे अक्षरशः एकलव्याप्रमाणे फक्त तेवढे एकच उद्दिष्ट्य डोळ्यापुढे ठेवून मी जगत होतो. माझी खोली, त्यात चालणारे माझे स्वयंपाकाचे प्रयोग आणि अभ्यास हेच तेव्हा माझे जग होते. या काळात मला मिळणाऱ्या पगारातून मी माझे घर मात्र दुरुस्त केले. पदव्युत्तर शिक्षणाच्या प्रवेश परीक्षेत मी राज्यात तेरावा आलो. आणि एमडी मेडिसिन करण्यासाठी नागपूरच्या मेयो कॉलेज मध्ये दाखल झालो. पण या सर्व प्रवासात एक नवे क्षितिज मला खुणावू लागले होते आणि ते होते आयएएस होण्याचे. एमडी परीक्षेत मी पहिला आलो. अंबाजोगाई मेडिकल कॉलेज मध्ये लेक्चरर म्हणून नोकरीला लागून महिन्याला साठ-सत्तर हजार कमवू लागल्यावर खरे म्हणजे मुक्काम गाठल्याची तृप्ती यायला हवी होती. पण या यशानेच मला अधिक मोठ्या यशाची ओढ लावली असावी. कारण सहा महिन्यानंतर मुंबईत जे जे रुग्णालयात दाखल होताक्षणी मी केंद्रीय लोकसेवा

आयोगाच्या परीक्षेच्या प्रशिक्षणासाठी नाव नोंदवले. पूर्ण वेळ चालणारी नोकरी आणि लोकसेवा आयोगाचा अभ्यास ह्या दोन्ही क्षेत्रातील वाटा फार खडतर होत्या आणि मी दोन्ही वाटेवर एकत्र चालण्याची इच्छा मनात बाळगून होतो..!

आणि अजूनही चालतो आहे...! समाजात होणाऱ्या कोणत्याही परीक्षेत मी केवळ उतरण्या पुरताच नाही तर त्या तीव्र स्पर्धेत इतरांना मागे टाकण्याइतका समर्थ आहे ही जाणीव मला माझ्या आजवरच्या, यशाच्या प्रत्येक टप्प्यावर मिळाली होती आणि त्यामुळेच मी आजही मला मिळालेल्या महसूल सेवेवर समाधानी नाही. आय ए एस झाल्यावर कामाच्या ज्या संधी समोर येतील त्या बहुविध क्षेत्रातील असतील, निर्णय प्रक्रियेच्या पातळीवर मला अधिक जोमाने काम करता येईल याविषयी मला खात्री आहे. मी आजवर अनेकदा मला मिळालेल्या आरक्षणाच्या संधीमुळे पुढे आलो आणि अशी संधी ज्या समाजाने मला दिली त्या समाजाला माझे माप भरून देण्याची मला इच्छा आहे आणि त्यासाठी मला आय ए एस व्हायचे आहे. वैद्यकीय सेवेचे शिक्षण मी घेतले आहे म्हणजे मी कधीही डॉक्टर म्हणून सेवा देऊ शकतोच, मला इच्छा आहे ती त्यापेक्षा अधिक काही देण्याची आणि त्यासाठी मी मार्ग निवडला आहे तो हा...!







# स्वप्नपूर्ती

**सोमनाथ काहोरे**

अतिशय प्रतिकूल परिस्थिती अवतीभवती असली आणि ती बदलण्याचा अखंड ध्यास मनात असेल तर काय घडू शकते? असे मला कोणी विचारले की मला माझेच आयुष्य आठवते. मी सोमनाथ कोहरे.

व्यसनाधीन वडील, जमिनीच्या वादातून रोज घरात होणारी भांडणे, रोजचीच उपासमार आणि घर चालवण्यासाठी आईचे अपार कष्ट..! कोणाच्याही आयुष्यात यापेक्षा अवघड असे काय असू शकते? पण अशा काळोखात एकच गोष्ट पुढचा रस्ता दाखवणारी होती आणि ती म्हणजे, मी शिक्षण घ्यावे यासाठी वडिलांची चालू असलेली धडपड. याचा अर्थ ते कधी माझ्या शाळेत येत होते किंवा माझ्या अभ्यासाची चौकशी वगैरे करत होते असे अजिबात नाही. धडपड करण्याचा एकच मार्ग त्यांना ठाऊक होता आणि तो म्हणजे मी शाळेत जावे म्हणून मला ठोकून काढण्याचा..! आम्ही तिघे भावंड. आईने कधीच शाळेचे तोंड बघितले नाही आणि वडील सातवीपर्यंत शिकलेले. घरी शेती होती पण ती भाऊबंदकीच्या जंजाळात अडकलेली. अशा परिस्थितीत जी ओढगस्त वाट्याला येते तीच आमच्या कुटुंबाच्या वाट्याला आली होती. रोजचे दोन वेळचे अन्न मिळवण्याचा एकच मार्ग आम्हा तिघा भावंडापुढे होता तो म्हणजे आश्रम शाळेच्या वसतिगृहात मुक्कामी जायचे. आणि आम्ही तो स्वीकारला. एकाच वेळी आम्ही तिघे जण कोहोरे (तालुका पेठ) आश्रम शाळेच्या वसतिगृहात राहत होतो. घरच्या उपासमारीपेक्षा शाळेत जे आणि जेवढे अन्न समोर येत होते ते सुद्धा आम्हाला एखाद्या मेजवानी सारखे वाटायचे.

अगदी प्रामाणिकपणे सांगायचे तर मी काही हुशार वगैरे विद्यार्थी नव्हतो. आणि आम्हाला शिकवण्यात शिक्षकांनाही फारशी आस्था नव्हती. त्यामुळे शाळेत टगेपणा करण्याचेच 'शिक्षण' मी अधिक प्रामाणिकपणे घेतले. रोज कोणाशी ना कोणाशी भांडणे उकरून काढायची आणि शाळेतून पळून जायचे हा माझा आवडता उद्योग पण या गुन्ह्याबद्दल वडिलांकडून एकदाच जबरदस्त शिक्षा मिळाली. चक्क झाडाला उलटे टांगून खालून मिरच्याची झणझणीत धुरी नाका तोंडात गेली, जीव घाबरा घुबरा झाला त्यानंतर मात्र कधीच शाळेला बुट्टी मारण्याची हिम्मत मी केली नाही. अर्थात अभ्यासाचा पाया मात्र फारसा कधी पक्का झाला नाही.

शाळेच्या वसतिगृहाने आम्हा भावडांचा दोन वेळचा जेवणाचा प्रश्न सोडवला पण रोजच्या जगण्यात आणखी पण काही गरजा असतातच की की . दोन जोड का होईना कपडे लागतात, थंडीत अंगावर ओढायला काही चिरगूट लागते. डोक्याला लावायला तेल, कपडे धुण्यासाठी साबण, चपला एक ना दोन. यापैकी काहीही घेणे हे वडिलांना शक्य नव्हते

मग आम्ही भावंडानी त्यावर एक उपाय काढला आणि तो होता शाळेच्या सुट्टीमध्ये मजुरी करण्याचा. भावंडामध्ये मी सर्वात धाकटा, पण मे महिन्याची सुट्टी लागली की मोठ्या दोघांबरोबर मी पण गावामधून निघायचो आणि पेठ फाट्यावर येऊन थांबायचो. आम्हाला मजुरी देणाऱ्या कंत्राटदाराची वाट बघत. सातवीपासून मी कांद्याच्या शेतात मजुरी करायला लागलो. पुढचा एक-दीड महिना आमचा मुक्काम शेतात उघड्यावरच असायचा. शिधा बरोबर बांधून आणलेला असायचा मग शेतातच चुलीवर भाजी-भाकरी बनायची. ते पैसे मग आम्हाला चपला-कपडे घेण्यासाठी उपयोगी पडायचे. अकरावी-बारावीच्या वर्गात असताना मी घरच्या शेतीची काम बघत होतोच. द्राक्ष बागेत पण काम करत होतो.

मी बारावी पास झालो तेव्हा डीएड ची जणू लाटच उसळली होती समाजात. त्या लाटेवर स्वर होत मीही डीएड साठी प्रवेश परीक्षा दिली पण तो मार्ग माझ्यासाठी नसावा बहुदा, त्यामुळेच माझी निवड होऊ शकली नाही. निराशेच्या या धक्क्यात पुढची वाट दिसत नव्हती मग काय सगळे मित्र नाशिकला शिकायला गेले आणि मलाही आग्रह करू लागले म्हणून मीही नाशिकला आलो. केटीएचएम कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यासाठी मला दोन हजार रुपये फी लागणार होती आणि आमच्या घरात पाच रुपये पण नव्हते. आईने जीवावर दगड ठेवत घरातील दोन्ही बकऱ्या विकल्या ज्याचे नऊशे रुपये आले. अकराशे रुपये आईने कोठून तरी उसने आणले आणि अगदी मोजके, फी पुरते पैसे खिशात ठेवून मी पेठ नाक्यावर उतरलो. पायात जुन्या, साध्याशा स्लीपर आणि हातात कळकट कपड्याची पिशवी घेऊन कॉलेज मध्ये प्रवेश घेण्यासाठी गेलो खरा पण तिथे असे वातावरण होते की माझ्या पायातील स्लीपर्सची आणि हातातील पिशवीत भरलेल्या कपड्यांच्या दोन जोड्यांची मलाच लाज वाटावी..! शिवाय फॉर्म विकत घेण्यासाठी आणखी दोनशे रुपये लागणार होते ते माझ्याकडे नाहीत याचे दडपण डोक्यावर होतेच. पण ह्या सगळ्यावर मात करत मी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्या वेळी माझी लग्न झालेली बहीण नाशिकमध्ये राहत होती. राहत होती असे म्हणण्यापेक्षा बिगारी कामासाठी नाशिकमध्ये आली होती असे म्हणणे जास्त योग्य ठरेल. दिवसा बिगारी काम आणि रात्री गोदावरीच्या काठावर मुक्काम अशा तिच्या दिनक्रमात मी पण सामील झालो. कॉलेज संपल्यावर उरलेला वेळ बिगारी काम करायचे आणि रात्री नदीच्या काठावर पथारी पसरायची. सहा महिने असा उघड्यावर मुक्काम केल्यावर मला समाजकल्याण खात्याच्या वसतिगृहात प्रवेश मिळाला.

गावातून शहरात शिकायला आलेल्या माझ्यासारख्या कमालीच्या बुजऱ्या, अबोल मुलाला या शहरात दोन व्यक्तींनी खूप माया दिली. एक, उमा जाधव आणि दुसरे संजय सावळे सर. दोघेही माझ्या कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. त्यांनी मला कॉलेजच्या कमवा-शिका मोहिमेत सामील करून घेत माझे बिगारी काम थांबवत माझ्या रोजच्या भाजी-भाकरीची सोय लावून दिली. आता माझ्या मनात पोलिस सब इन्स्पेक्टर होण्याचे स्वप्न मूळ धरू लागले होते. त्यामुळे कॉलेज सुटले की मी सार्वजनिक वाचनालयाच्या पानसे अभ्यासिकेत जाऊन रात्री नऊ वाजेपर्यंत तिथे अभ्यास करत असे. त्या काळात हवालदार पदासाठी भरती जाहीर झाली. मला त्या नोकरीची सर्वाधिक गरज होती. कारण घरची परिस्थिती पार खालावली होती आणि ही नोकरी मिळाली असती तर मला अकरा हजार पगार मिळाला असता. एकरकमी एवढे पैसे माझ्या कुटुंबाने कधी बघितलेच नव्हते..! आणि मला ही नोकरी मिळाली. माझ्या पहिल्या पगारात मी आईला मंगळसूत्र केले मग आमचे घर ठीकठाक करून घेतले. पण इन्स्पेक्टर होण्याचे स्वप्न मनात अजून जागेच होते. आणि त्यासाठी तयारीही.

सब इन्स्पेक्टर पदाचे जे प्रशिक्षण मी आता घेत आहे त्यासाठी माझी निवड होणे ही माझ्या चिकाटीची, संयमाची सर्वाधिक अवघड परीक्षा होती. २०१० साली मी पूर्व परीक्षा उत्तीर्ण झालो पण मुख्य परीक्षेत नापास झालो. ११, १२ आणि १३ हाच सिलसिला सुरू होता. या काळात निराशेच्या गर्तेत पडण्यापासून मला दोन गोष्टींनी वाचवले. एक, विपश्यना आणि दुसरी, हातात लागलेले 'सिक्रेट' नावाचे अद्भुत पुस्तक! विपश्यनेने मला शांत केले आणि 'सिक्रेट'ने मला माझ्यातील सामर्थ्यावर विश्वास ठेवण्याचे बळ दिले. चौथ्या परीक्षेपूर्वी संजय अपरांती यांनी माझी कसून तयारी करून घेतली. आणि माझ्यातील जिद्द एवढी धारदार झाली होती की शारीरिक चाचणीमध्ये मला शंभरपैकी शंभर गुण मिळून मी महाराष्ट्रात तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झालो..! क्षणभर विश्वास बसू नये असेच

सगळे घडत होते...

सब इन्स्पेक्टर पदासाठी निवड झाल्यावर मी सर्वात प्रथम कोणती गोष्ट केली असेल तर माझ्या कोहोर गावात दारूबंदी करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. कारण एव्हाना वडिलांच्या बरोबरीने मोठा भाऊ पण दारूच्या आहारी गेला होता. एक अख्खी पिढी बरबाद होताना दिसत होती आणि गावाचे अंधारलेले भविष्यही..! सर्वात आधी आमच्या पोलिस प्रशिक्षण अकादमीचे प्राचार्य संजय मोहिते यांना भेटलो मग अन्य अधिकाऱ्यांना भेटलो. गावात दारूबंदीची पोस्टर्स लावून घेतली. गावामध्ये एक बैठक घेतली, पंच कमिटीचे सदस्य, गावातील तरुण यांना भेटलो आणि शेवटी थेट ग्रामसभेत पण गेलो. फौजदार झालेल्या गावातील या मुलाला, मला मग ग्रामसभेने बसण्यासाठी सन्मानाने खुर्ची दिली. आणि मी माझ्या आयुष्यात प्रथमच एक भाषण दिले, मला सर्वात त्रासदायक असलेल्या गावातील वास्तवाबद्दल. गावात दारूबंदी केली तर तुमची मुले पण माझ्याप्रमाणे फौजदार होऊ शकतात हे माझे म्हणणे गावाला पटले पण दारूबंदी मधील सर्वात मोठी अडचण होती ती राजकीय लोकांची. मग आम्ही घराघरातून स्त्रियांना गोळा करत एक भला मोठा मोर्चा गावात काढला. तरीही दारूबंदीला विरोध सुरूच राहिला. मग शेवटी माझ्या गणवेशाने मला दिलेला अधिकार वापरत धमकी दिली, दारूबंदी झाली नाही तर दारूचे अड्डे उद्ध्वस्त करण्याची आणि वर मुख्यमंत्र्यांपर्यंत जाण्याची धमकीही..! ही मात्र उपयोगी ठरली आणि गावात ऑगस्ट पासून दारूबंदी सुरू झाली...! माझे दुसरे स्वप्न पूर्ण झाले. आजही गावात दारू येते पण ती फार थोडी कारण ती चोरून आणलेली असते.

आज मी कातकरी समाजाची दोन मुले दत्तक घेतली आहेत. माझ्या आयुष्यात अतिशय खडतर वेळी माझ्या पाठीवर हात ठेवणारे सावळे सर मला भेटले तीच भूमिका मीही केली पाहिजे असे वाटून मी हा पुढाकार घेतला आहे. पैशाअभावी शिक्षण बंद होऊ नये म्हणून या सर्वात गरीब समाजाच्या मुलांचा शैक्षणिक खर्च मी करतो. पण माझे पुढचे स्वप्न आहे ते माझ्या कोहर गावात अभ्यासिका सुरू करण्याचे आणि त्यामार्फत पोलीस दलात जाण्यासाठी मार्गदर्शन करण्याची सोय गावात करण्याचे...! स्वप्न पूर्तीचा मार्ग मला 'सिक्रेट'ने दाखवला आहे त्यामुळे माझे हेही स्वप्न पूर्ण होईल याची मला खात्री आहे...






# ऋणमुक्त होण्यासाठी...

**डॉ. लखोजी चौधरी**

डॉ.लखोजी चौधरी, एम डी अशी माझी ओळख सांगताना मला आठवत असतात ते माझे नवोदय शाळेतील दिवस, त्या शाळेतील शिस्त, तरीही एकदा रात्री उशिरा सिनेमाला जाण्याचा आम्ही केलेला 'पराक्रम' आणि त्यानंतर चोरी पकडली गेल्यावर आलेले ओशाळेपण! या आठवणींमध्ये खूप वेगवेगळे रंग आहेत. ठाणापाडा नावाच्या छोट्याश्या शाळेत गेलेले बालपण आणि शिक्षण. वडील शिक्षक असल्यामुळे घरात शिक्षणाला विरोध असण्याचे काही कारण नव्हते उलट त्यासाठी आग्रह होता. त्यामुळे आम्ही चौघे भाऊ शाळेत गेलो. अर्थात जो-तो आपल्या आवडीच्या वाटेने जात आपले काम, व्यवसाय निवडून आज जगतोय. लहानपणापासून काहीतरी वेगळे, खूप काही मोठे होण्याची इच्छा होती. लहान वयात त्या 'मोठे होणे' नावाच्या स्वप्नाला काही निश्चित आकार-उकार नव्हता पण शाळेत जाऊन शिक्षण सुरू झाले, दिशा दाखवणारे गुरू भेटू लागले तसे हे स्वप्न पक्का रंग घेऊ लागले. मोठे होण्याच्या इच्छेला एका दिशेची बैठक मिळाली आणि त्यासाठी हातभार लागला तो नवोदय नावाच्या एका शिस्त बद्ध चौकटीचा.

माझे वडील एका आश्रम शाळेत शिक्षक होते. ठाणापाडा येथील जिल्हा परिषद शाळेत माझे शिक्षण सुरू झाले. पाचवीसाठी निरगुडेच्या आश्रम शाळेत आलो तेव्हापासून जाणवत होते अभ्यास आपल्याला मनापासून आवडतो. त्याला शिक्षकांचा पाठिंबा मिळत गेला त्यामुळे केंद्र सरकारची नवोदय प्रवेश परीक्षा मी उत्तीर्ण झालो आणि त्या एका यशाने एका खूप मोठ्या जगाचे दरवाजे माझ्यापुढे उघडत गेले. माझी नवोदय शाळा होती खेडगावला. आमची चाळीस मुलांची तुकडी होती. या मुलांनी फक्त अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे अशी अपेक्षा असल्याने आमची सगळी काळजी या शाळेत घेतली जायची. आमचा आहार, आरोग्य, पुस्तक-वह्या इथपासून ते आमच्या सवयी-शिस्तीपर्यंत प्रत्येक गोष्ट जणू या शाळेत भिंगाखाली धरलेली असायची. वर्गात असलेले सर्व विद्यार्थी हुशार या वर्गात मोडणारे. त्यामुळे एका निकोप स्पर्धेला तोंड देण्याचे पहिले धडे मला या शाळेत गिरवायला मिळाले. त्या स्पर्धेत कोणताही भेदभाव नव्हता. जातिभेद नव्हता की आर्थिक हिशोब नव्हता. होती फक्त एक उत्तम विद्यार्थी घडण्याची प्रक्रिया. पाचवीपासून आमचा अभ्यासक्रम सेमी इंग्लिश असल्याने या भाषेची ओळख नक्कीच झाली. तिच्याशी भले दोस्ती झाली नसेल पण तिचा धाक नक्कीच कमी झाला.

नवोदय शाळा हे जणू माझे दुसरे घरच होते. शाळेचा परिसर गावाबाहेर होता. त्यामुळे संध्याकाळ होताच परिसर शांत होत असे. झोपेच्या वेळा ठरलेल्या, कारण पहाटे लवकर उठून व्यायाम करावा लागत असे. त्याचा मात्र

भला कंटाळा येत असे. पण कोणतीही गोष्ट चुकवणे, बुट्टी मारणे हे तिथल्या संस्कृतीत बसणारे नव्हतेच. प्रत्येक विद्यार्थ्याकडे स्वतंत्रपणे लक्ष दिले जात असे. त्यामुळे ती शिस्तीची चौकट झुगारणे कधीच शक्य होत नसे. एक मात्र नक्की, सर्व विद्यार्थ्यांचे एकच वेळापत्रक असल्याने एक दृढ असा बंध आम्हा सर्वांमध्ये निर्माण झाला, इतका की आपापली नोकरी संपून निवृत्त झाल्यावर सगळे तेव्हाचे मित्र एकत्र राहण्याचा विचार आज करतो आहोत. अर्थात जेव्हा मी शाळेत प्रवेश घातला तेव्हा मात्र फार-फार बुजरा होतो. खूप अबोल होतो आणि हे बुजरेपण, अबोल स्वभाव पार कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षण घ्यायला जाईपर्यंत कायम होते.

नाशिकच्या पंचवटी कॉलेज मध्ये अकरावी-बारावीचे शिक्षण घेऊन मी मिरज कॉलेजमध्ये एमबीबीएस करण्यासाठी दाखल झालो. व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी इथे देशभरातून विद्यार्थी आले होते. आपापली भाषा-स्वभाव आणि संस्कृती घेऊन. इतरांना मागे टाकून पुढे येण्यासाठी लागणारा स्मार्टपणा त्या प्रत्येकात होता. मी मात्र शाळेत होतो तसाच होतो. बुजरा, अबोल, स्वतःला विनाकारण कमी लेखणारा. त्यावर मात करता-करता अभ्यासाशी जमवून घ्यावे लागण्याची लढाई मला थकवून टाकत होती आणि त्याचा अपेक्षित तोच परिणाम झाला. पहिल्या सत्रात मी जेमतेम उत्तीर्ण झालो. पण मला भान देण्यासाठी तेवढा एकच धक्का पुरेसा होता. काहीतरी मोठे होण्याच्या मनातील इच्छेला त्या एका घटनेने धुमारे फुटले. स्वतःलाच मी विचारत होतो, वर्गातील इतर मुलांमध्ये असेल स्मार्टपणा, भले माझ्यात नसेल पण अभ्यास समजून घेण्याची कुवत नक्कीच आहे आणि परिस्थितीवर मात करण्याची जिद्दही, मग मी का मागे राहतोय? एकही डॉक्टर नसलेल्या कोहोर सारख्या माझ्या गावातल्या लोकांना वैद्यकीय सेवा देण्याचे माझे स्वप्न मी अशा किरकोळ कारणाने कसा विसरू शकतो? आणि अशा तऱ्हेने स्वतः ला पुढे ढकलत, माझ्यातील न्यूनगंडावर मात करत मी अभ्यासाला लागलो. फक्त ध्येयावर दृष्टी ठेवून. मिरज मधून एमबीबीएस आणि त्यानंतर सायनच्या लोकमान्य टिळक कॉलेज मधून मेडिसिन मध्ये एम डी असा मोठा पल्ला मी याच एका ध्येयावर दृष्टी ठेवत पार केला. कोणीतरी वापरलेली पुस्तके वापरत आपण शिक्षण घेत आहोत ते केवळ एकाच ध्येयाने याचे स्वतःला सतत स्मरण देत राहिलो.

एमबीबीएस झाल्यावर एक वर्ष सुरगाणा तालुक्यातील पळसन आरोग्य केंद्रात मी नोकरी केली. त्या नोकरीने मला पुन्हा छोटी गावे- पाडे येथील आरोग्य व्यवस्थेची किंवा खरे तर प्रश्नांची जाणीव करून दिली. आजही ग्रामीण भागात आरोग्य विषयाशी निगडित असलेले अनेक समज-गैरसमज याची ओळख करून दिली. पैशाअभावी होणारी गरीब आदिवासी लोकांची कोंडी या काळात जवळून बघायला मिळाली. त्यामुळे आता जरी मी नाशिकसारख्या शहरात हॉस्पिटल चालवत असलो तरी माझे सुट्टीचे शनिवार-रविवार हे माझ्या कोहोर गावासाठी आणि तेथील रुग्णांसाठी असतात. या गावाचे जसे माझ्या वर ऋण आहे तसेच मला शिकता यावे म्हणून वेळोवेळी, अनेक योजनांद्वारे मदतीचा हात देणाऱ्या शासकीय योजना यांचेही कितीतरी ऋण आहेच की! माझ्या गावात सेवा देणे हा त्या ऋणातून अंशतः मुक्त होण्याचा एक प्रयत्न आहे इतकेच...





# स्त्री शिकली, शहाणी झाली...

**डॉ. नंदा गायकवाड**

स्त्री-पुरुष समानतेविषयी पोटतिडकीने बोलणारी, लिहिणारी शहरी माणसे जेव्हा-जेव्हा मी बघते तेव्हा मला माझ्या आदिवासी समाजाची आठवण येते आणि त्या समाजाचा अभिमानही वाटतो. कारण ठाऊक आहे? कारण एकच, समानतेचा आग्रह धरण्याची वेळ या समाजातील मुलींवर फारशी येतच नाही कारण तो समाज गेल्या कित्येक वर्षापासून मुलींना मुलांच्या बरोबरीने, समान वागणूक देत आहे. मुलगी वयात येताच तिचे लग्न उरकून टाकण्याची घाई करणे हेही ह्या समाजाच्या मानसिकतेत बसत नाही. मी याच समाजात जन्माला आले, वाढले आणि शिकून स्वतःची एक ओळख निर्माण केली. त्यासाठी माझ्या कुटुंबाने जशी मला मदत केली तशी अनेक शासकीय योजनांनी पण मला वेळोवेळी मदतीचा हात दिला.

मी डॉ. नंदा गायकवाड-ठाकरे. तीन भावांची एकुलती एक बहीण. दिंडोरी गावात देवसाने इथे आम्ही राहत होतो. वडील निरक्षर पण म्हणूनच त्यांनी आपल्या मुलांबाबत सतत शिक्षणाचा आग्रह धरला आणि त्यामुळेच आम्हा भावंडांचे शिक्षण कधी थांबले नाही. मला प्रेरणा मिळत गेली ती माझ्या मोठ्या भावाकडून. तो एम.एस. झालाय तर त्याच्या पेक्षा धाकटा एका शाळेत मुख्याध्यापक आहे. सर्वात धाकटा भाऊ शेती करतो. माझ्या गावातील शासकीय आश्रम शाळेत राहून मी सातवी पर्यंतचे शिक्षण घेतले. आमच्या घरात कधी पुरेसे पोटभर अन्न खायला मिळाले नाही असे असे कधीच झाले नाही पण तरी आश्रमशाळेत गेल्यावर जेव्हा प्रथम वरण-भातासह संपूर्ण जेवण सामोरे आले तेव्हा त्याचे खूप अप्रूप वाटले. या शाळेने मला नव्या मैत्रिणी करण्याचे धडे दिले. सातवीच्या वर्गात असताना मला इंग्लिश वाचता येऊ लागले होते हा एक मोठा फायदा होता पण मला गरज होती ती अभ्यास कसा करायचा ते शिकण्याची. तो मंत्र मला हवा होता आणि विषयांना भिडून अभ्यास करण्याची सवय पण लागायला हवी होती. तो धडा मला मिळाला तो आठवीत शहरात शिकायला आल्यावर. डॉक्टर होण्याची इच्छा शाळकरी वयापासून माझ्या मनात होती कारण मोठ्या भावाचा आदर्श समोर होता. पण त्या दिशेने जाण्यासाठी काय करावे लागते ह्याची निश्चित वाट ठाऊक नव्हती.

नाशिकमधील रमाबाई आंबेडकर विद्यालयात आठवीसाठी दाखल झाले तेव्हा शहरातील एक अफाट मोठे जग माझ्यासमोर आले. उच्च शिक्षणासाठी जीवतोड मेहेनत करणाऱ्या समवयीन मुली मला दिसू लागल्या आणि माझ्यातील ठिणगी प्रज्वलित होऊ लागली. डॉक्टर व्हायचे असेल तर मेहनतीशिवाय दुसरा मार्ग नाही हे जाणवून मी जी कामाला लागले ते आजतागायत थांबले नाहीय.

अकरावी-बारावीचे शिक्षण घेताना मला आधार

होता तो संत जनाबाई वसतिगृहाचा. वैद्यकीय प्रवेशासाठी जी जीवतोड मेहनत करावी लागते त्यासाठी अनुकूल वातावरण त्या वसतिगृहात होते. माझी मेहनत आणि वसतिगृहाचा आधार यामुळे मी वैद्यकीय प्रवेशासाठी पात्र ठरले. बी जे मेडिकल सारख्या अत्यंत प्रतिष्ठेच्या महाविद्यालयात मी प्रवेश घेतला होता. पुण्यातील हे जग नाशिकच्या वसतिगृहाच्या जगापेक्षा अधिकच वेगळे होते, अधिक तरतरीत होते. त्यात सफाईने इंग्लिश बोलणारी चटपटीत मुले-मुली होती. न्यूनगंड येण्यासाठी एवढा ऐवज पुरेसा होता. मी त्या नैराश्याच्या खाईच्या दिशेने निघालेही होते पण स्वतःला कमी न लेखण्याच्या माझ्यातील अंगभूत आत्मविश्वासाने मला त्यावेळी तारले आणि मीही इंग्लिश बोलण्याचा सराव करू लागले. चुकेन, पण प्रयत्न केला नाही तर अगदी मुकी होऊन जाईन मी असे स्वतःला समजावत मी पुढे सरकत होते.

निव्वळ एमबीबीएस होऊन समाधानी राहणे हे मला अगदी प्रारंभापासून मंजूर नव्हतेच त्यामुळे वारे गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करत असताना मनात विचार होते ते पुढील शिक्षणाचे! पुण्यातच मी माझे पदव्युत्तर शिक्षण घेतले आणि रुबी सारख्या अतिशय प्रतिष्ठित रुग्णालयात दोन वर्ष अतिदक्षता विभागात काम केले. काम करण्याचा हा अनुभव शिक्षणापेक्षा खूप वेगळा, समाज जीवनाची जवळून ओळख घडवणारा होता. तोच अनुभव मला आता नाशिकमधील महापालिकेच्या रुग्णालयात काम करताना उपयोगी पडतो आहे. मुख्य म्हणजे, समाजातील अतिशय गरजू, वंचित लोकांना शासकीय योजनांचा लाभ कसा मिळवून देता येईल ह्या दृष्टीने माझ्या कामाकडे बघण्याची एक समज मला या रुबीमधील अनुभवाने दिली आहे.

मला शासनाकडून जे काही मिळाले ते माझे आयुष्य बदलून टाकणारे होते. आयुष्याचा दर्जा बदलणारे होते आणि त्याबद्दल मनात असलेली कृतज्ञता व्यक्त करायची तर मला समाजासाठी काहीतरी केले पाहिजे ही सध्या मनात असलेली प्रबळ भावना आहे. आता मला समाजाला काही दिले पाहिजे असे मला सतत वाटते आहे. आणि त्यासाठी मी मार्ग निवडला आहे तो बचत गटांचा. गरजू स्त्रियांना आर्थिक स्वावलंबी करण्याचा इतका चांगला दुसरा मार्ग नाही. माझ्या पुढाकारातून सुरू झालेल्या शारदा महिला बचत गटात आज आठशेहून अधिक स्त्रिया सहभागी आहेत. आदिवासी विकास विभागातर्फे त्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी उपयुक्त ठरेल असे व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते. अर्थात हे काम सोपे नाही कारण पैसे मिळवणाऱ्या बहुसंख्य स्त्रियांची मानसिकता आजही 'घरासाठी काम' अशीच आहे. स्वतःच्या आर्थिक स्वावलंबनाचा विचार तिच्या मनात फार क्वचित येतो ! पण तरी माझे आणि माझ्या टीमचे प्रयत्न सुरू आहेत. कारण बाई शिकली, शहाणी झाली तर कुटुंबाच्या जगण्याचा दर्जा किती बदलतो त्याचा अनुभव मी स्वतः घेतला आहे.





# गरज कणखर नेतृत्वाची

**ललिता चव्हाण**

माझी आई निरक्षर पण शिवणकाम करायची आणि ती जे काम करायची ते इतके सुबक, इतके बिनचूक असायचे की बघणाऱ्याने चकित व्हावे. ते काम बघून मला नेहमी वाटते, माझी आई हुशार असावी पण परिस्थितीने तिला शिक्षण घेण्याची संधी नाकारली असणार. ह्या एकाच गोष्टीने मला सतत शिक्षण घेण्याची प्रेरणा दिली आहे. मी ललिता चव्हाण. दहावी उत्तीर्ण झालेले माझे वडील आदिवासी विकास महामंडळाच्या दिंडोरी शाखेत शिपाई म्हणून काम करतात आणि शाळेचे तोंडही बघण्याची संधी न मिळालेली माझी आई घरीच शिवणकाम करते. आपल्या अंगभूत हुशारीमुळे असेल किंवा परिस्थिती बदलण्याची मनापासून इच्छा असेल म्हणून पण आम्ही तिघी बहिणी आणि एक भाऊ असे सगळे शाळेत गेलो. आणि फक्त शाळेत गेलोच नाही तर भावाने फार्मसी मध्ये पदवी घेतली, एक बहिण बी एस्सी (न्युट्रीशन) आणि मी होमिओपॅथी डॉक्टर झाले. तिसरी बहीण शिकते आहे.

आमचे मूळ गाव देवळी बिलवडी. बारावीपर्यंत मी दिंडोरीतील जनता इंग्लिश स्कूलमध्ये शिकले. घरीच राहून शिक्षण घेण्याचे सुख मला मिळाले त्यामुळे घरापासून दूर राहण्याचा फारसा अनुभव नव्हताच. शाळेतील एक हुशार विद्यार्थिनी असा शाळेत माझा लौकिक होता कारण मी वर्गात कायम पहिली येत होते. शिष्यवृत्ती मिळवत होते. समोर येईल तो अभ्यास मनापासून करणे मला ठाऊक होते पण पुढे काय शिकायचं या प्रश्नाच्या उत्तराची निश्चित दिशा मात्र दिसत नव्हती. बारावीमध्ये असताना मला जाणवू लागले, जीवशास्त्र (बायोलॉजी) विषय आपल्याला विशेष आवडतोय. या टप्प्यावर मला पुढे जाण्यासाठी मदत दिली ती आ. झिरवाळ यांचे स्वीय सचिव गोपीनाथ गांगुर्डे यांनी. आणि पुढच्या शिक्षणासाठी मी नाशिकला निघाले. मोतीवाला कॉलेजमध्ये मला होमिओपॅथीच्या पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला होता आणि नाशिकमध्ये राहायचे कोठे हा प्रश्न आदिवासी विकास विभागाच्या मेरी येथील वसतीगृहामुळे सुटला

कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला, राहण्याची सोय झाली आता पुढील परीक्षा माझी होती. नव्या वातावरणाशी जुळवून घेण्याची. ह्या परीक्षेत मला खूप लोकांनी मदत केली. कॉलेजच्या पहिल्या वर्षापासून आम्हाला विविध रुग्णालयात काम अनुभव घेण्यासाठी जावे लागत होते त्यामुळे माझी सकाळी वसतिगृहातून निघण्याची वेळ पक्की होती पण येण्याची वेळ मात्र कमालीची अनिश्चित असायची. या काळात वसतिगृहाच्या प्रमुख संध्या पवार यांनी माझी, माझ्या जेवणाची आबाळ होऊ नये म्हणून जी काळजी घेतली ती एखाद्या कुटुंबीयाने घ्यावी तशी होती. अभ्यासाच्या पुस्तकांसाठी मला समाजकल्याण खात्याच्या

पुस्तक पेढीची पण खूप मदत झाली.

माझे कॉलेज खूप कडक शिस्तीचे होते त्याचा मला खूप फायदा झाला कारण कॉलेजकडून ज्या गोष्टी करायला सांगितल्या जात त्यात कधीच सवलत मिळत नसे. मला सर्वांसमोर बोलण्याची फारशी सवय नव्हती आणि त्यात अनेकदा भाषा हा मुद्दा होताच. कोणत्याही प्रकारचे सादरीकरण (Presentation) तयार करून ते सर्वांसमोर मांडणे मी कधीच शिकले नव्हते पण ही प्रत्येक गोष्ट मला कॉलेज मध्ये करावी लागली. आता असे वाटते कि, ही शिस्त नसती तर कदाचित मी ह्यापैकी काहीच करू शकले नसते. मला अमुक गोष्ट येत नाही म्हणून मागे राहिले असते, गोष्टींना सामोरे जाणे टाळले असते तर नवे शिक्षण, नवे तंत्र, लोकांसमोर धीटपणे आपले म्हणणे मांडणे ह्या कोणत्याही गोष्टी माझी आयुष्यात आल्या नसत्या. शिक्षणाचा हा, साडेचार वर्षांचा काळ मला खूप शहाणे करणारा, व्यक्ती म्हणून अनेक कौशल्य शिकायला लावणारा आणि आत्मविश्वास वाढवणारा होता. एक व्यवसायिक म्हणून मला रुग्णांचे जग जवळून बघण्याची संधी मला माझ्या इंटर्नशिपच्या काळात संजीवनी आणि जयराम हॉस्पिटलमध्ये मिळाली.

सध्या मी सनराईज हॉस्पिटल मध्ये वैद्यकिय अधिकारी म्हणून काम करते आहे पण पदव्युत्तर शिक्षण घेण्याची प्रबळ इच्छा मनात आहे आणखी एक इच्छा आहे ती लोकांचा होमिओपॅथीवर विश्वास वाढावा यासाठी प्रयत्न करण्याची, कारण अजून या पॅथीविषयी लोकांच्या मनात विश्वास नाही. प्रत्येक पॅथीच्या काही मर्यादा असतात आणि काही बलस्थाने, त्या लक्षात घेऊन त्याचा वापर करायला हवा असे मला वाटते. त्या दृष्टीने लोकशिक्षण होण्याचे काम करायला मला आवडेल. माझ्या शिक्षणाने मला आणखी काय शिकवले? मला वाटते आदिवासी मुलींमध्ये खूप क्षमता आहेत पण त्यांनी अधिक प्रयत्न करण्याची, धडपड करण्याची खूप गरज आहे. आणि या वर्गासाठी ज्या सुविधा शासनाने दिल्या आहेत ती माहिती त्यांच्यापर्यंत जाणे फार गरजेचे आहे तरच या वर्गातून मुली पुढे येतील. या वर्गातून एखादे कणखर नेतृत्व, स्त्री नेतृत्व निर्माण झालेले नाही त्यामुळे आदिवासी मुली धिटाईने पुढे यायला घाबरतात, संकोच करतात.

आणखी एक दुःख आहे, ते म्हणजे आमच्या बीएचएमएस पदवीला शासनमान्यता नसल्याचे. आम्ही शासकीय नोकरीत वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करू शकत नाही. हे चित्र लवकर बदलावे असे मला वाटते.





# देणे समाजाचे

**डॉ. प्रल्हाद चव्हाण**

आपल्या मुलाने शिक्षण घेऊन स्वतःची ओळख निर्माण करावी अशी मनापासून इच्छा बाळगणाऱ्या अनेक आदिवासी कुटुंबातील मुलांप्रमाणेच मी एक. आधी केवळ, प्रल्हाद चव्हाण अशी सर्वसामान्य ओळख असलेला आणि आता डॉक्टर प्रल्हाद चव्हाण, एम.डी अशी ओळख अभिमानाने सांगणारा. पण हा प्रवास अर्थातच अवघड, स्वतःचे कुटुंब घर, यापासून दूर राहून करावा लागलेला.

दहावी शिकलेल्या आई-वडिलांची आम्ही पाच मुले. वडील दिंडोरी तालुक्यातील देवसाने गावातील आश्रम शाळेत शिक्षक म्हणून काम करत होते. मी सर्वात धाकटा. एक भाऊ शिक्षक, बहीण शिक्षिका, एक बहीण नर्स तर आणखी एक बहीण शेती सांभाळणारी. अशा कुटुंबात वाढणारा मी कसा काय डॉक्टरकीच्या वाट्याला गेलो? आता मागे वळून बघत असताना तो बदलाचा क्षण स्पष्टपणे आठवतो. शाळेत स्काउट तर्फे खरी कमाई करण्यासाठी आम्हाला लोकांच्या घरी काम करण्यासाठी जावे लागत असे. असाच एकदा खरी कमाई करण्यासाठी डॉ. सुराणा यांनी त्यांच्या आवारातील गवत काढायला लावले. गवत काढता-काढता डॉक्टर कसे वागतात, लोक त्यांना कसे आदराने वागवतात हे दिसत होते. तेव्हा एकूणच, डॉक्टर व्यक्तीला समाजात मिळणारा मान आणि त्यांची ऐट बघून मला मनापासून वाटले, भविष्यात आपणही डॉक्टर व्हावे. मुख्य म्हणजे, ही इच्छा मनात मूळ धरून राहिली. लहानपणी बघितलेल्या अनेक स्वप्नांपैकी एक असे म्हणून वाढत्या वयात मागे पडली नाही. याचे एक कारण कदाचित मला अगदी प्राथमिक शाळेत, देवसाने येथील शासकीय आश्रम शाळेत मिळालेले शिक्षण असेल. चौथीपर्यंत आम्हाला एकच शिक्षक शिकवायला होते पण जे काही शिकलो त्याने शिक्षणाची गोडी मनात निर्माण केली. चौथीची शिष्यवृत्ती मला त्याचमुळे मिळाली. पाचवीच्या पुढील शिक्षणासाठी माझी नवोदयसारख्या शाळेत निवड झाली होती पण घरापासून फार दूर पाठवण्यास माझे कुटुंब फारसे राजी नव्हते. मग मी नवोदय सारखीच, फक्त शिष्यवृत्तीधारक मुलांसाठी असलेल्या जिल्हा परिषदेच्या देवला शाळेत दाखल झालो

एका कौलारू घरात आमचे हे वसतिगृह होते. एका खोलीत आम्ही दहा-बारा मुले राहत होतो. प्रत्येकाला एक गादी आणि एक पेटी एवढा 'ऐवज' मिळाला होता. आपल्या माणसांपासून इतके दूर राहण्याची आणि परिस्थितीशी जमवून घेण्याची ही माझी पहिलीच वेळ. पहिले काही दिवस मी घराच्या आठवणीने अक्षरशः बेजार झालो होतो. हे असे शिक्षण नाही झेपणार आपल्याला असे कित्येकदा मनात येऊन गेले. पण हळूहळू त्या वातावरणात असलेली चुरस जाणवू लागली. तिथे आलेला प्रत्येक मुलगा आयुष्यात

पुढे जाण्याच्या इच्छेने, काहीतरी होण्याच्या ध्यासाने तिथे आला होता. असा ध्यास तर माझ्याही मनात होताच फक्त घराच्या आठवणींच्या गुंत्यात तो मागे पडू लागला होता. अंगावरील धूळ झटकून पुन्हा कामाला लागावे तसे मी स्वतःला भानावर आणले आणि अभ्यासाला लागलो तो वैद्यकीय प्रवेश मिळेपर्यंत. मानूरच्या जनता विद्यालयातून अकरावी-बारावी झाल्यावर धुळ्याच्या भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयात माझे डॉक्टरकीचे शिक्षण सुरू झाले.

शालेय जीवनात इंग्लिश भाषेशी मी बऱ्यापैकी मैत्री केली होती पण तरी एमबीबीएस चे शिक्षण सुरू झाल्यावर मात्र पहिले काही महिने माझी चांगलीच भंबेरी उडाली. सर्व भारतभरातील मुले-मुली वर्गात होती. एका अर्थाने एका वेगळ्या, आजवर न बघितलेल्या अशा संस्कृतीशी मला जमवून घ्यावे लागत होते. वसतिगृहातील वातावरण एकदम शहरी होते. पुन्हा एकदा माझ्या छोट्या गावाची, घराची आठवण येऊ लागली. ही सगळी कारणे माझ्या अभ्यासावर परिणाम करण्यासाठी पुरेशी होती. पहिल्याच वर्षी मी शरीरशास्त्र (anatomy) विषयात नापास झालो. पण तेवढा एक धक्का भानावर येण्यासाठी पुरेसा होता. एमबीबीएस झाल्यावर सुरगाणा तालुक्यातील बाऱ्हे गावातील ग्रामीण आरोग्य केंद्रात मी वैद्यकीय अधिकारी म्हणून काम सुरू केले. ग्रामीण भागातील आरोग्य समस्या जवळून बघण्यासाठी त्या कामाने मला खूप मदत केली आणि हेही जाणवले की अशा प्रकारच्या प्रश्नांशी लढण्यासाठी केवळ एमबीबीएसची पदवी पुरेशी नाही. अधिक शिक्षण घेण्याचा निश्चय करण्यासाठी मला या नोकरीने मदत केली. आणि मग मी एम डी साठी तयारी सुरू केली.

अंबेजोगाई येथील रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयामधून मी एम डी (मेडिसिन) केले. पुन्हा एकदा वसतिगृहाचा अनुभव. पण आता मी या शहरी वातावरणाला, अभ्यासातील किचकटपणाला सरावलो होतो. पाठीशी ग्रामीण भागातील कामाचा अस्सल अनुभव असल्याने वैद्यकीय प्रश्नांची ओळख झाली होती. आणि मला नेमके काय करायचे आहे त्याचे भान आले होते. मी ज्या गावात, परिसरात वाढलो त्याचे प्रश्न मला ठाऊक होते आणि त्या प्रश्नांवर काम करण्याची मला इच्छा होती. माझ्या भागाचा सर्वात मोठा प्रश्न होता तो सर्पदंशाचा. सर्पदंशावर उपचार आमच्या गावाच्या आसपास कुठेही उपलब्ध नाहीत. म्हणजे उपचारांची अनुपलब्धता आणि सर्पदंशाची प्रचंड मानसिक भीती या कोंडीत सापडणाऱ्या रुग्णाच्या हालांची तुम्ही कल्पना करू शकता. त्यामुळेच एम डी झाल्यावर मी माझे कार्यक्षेत्र म्हणून कळवणची निवड केली. चांदवडला मिळालेली नोकरी नाकारून. आज मी कळवण येथील ग्रामीण रुग्णालयात काम करतोय. ज्या परिसराने मला मोठे केले, शिकण्याच्या संधी दिल्या त्याच ठिकाणी सेवा देण्याचा एक आनंद मला मिळतो आहे.





# टिंब टिंब ते डॉक्टर : एक अनोखा प्रवास

**साहेबराव झिरवाळ**

टिंब टिंब रामचंद्र झिरवाळ या नावाने शाळेत ज्याची सगळे थट्टा करत असा मी एक मुलगा. डॉक्टर झालो, भूलतज्ज्ञ झालो तरी या शाळेच्या आयुष्यातील आठवणी आजही विसरलो नाहीय. शाळेच्या भिंती सारवण्यासाठी चोरून गोळा केलेले शेण, आदिवासी आश्रम शाळेत राहणारे आमचे शिक्षक, कौलारू खोल्यांमधून दिवसा भरणारी शाळा आणि रात्री तिथेच मुक्काम. खूप वेगळा होता तो अनुभव आणि त्यामुळे घडलेले माझे आयुष्य. मी कधीकाळी डॉक्टर होईन असे मला कुणी सांगितले असते तर त्याच्या या भविष्यवाणीला मी हसलो असतो. पण ते जेव्हा प्रत्यक्षात आले तेव्हा मला त्यासाठी मदत करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीबद्दल मनापासून कृतज्ञ भाव मनात जागा झाला.

तर, माझे खरे नाव साहेबराव झिरवाळ. मुक्काम वनारे, पोस्ट वारे, तालुका दिंडोरी. छोट्या गावात राहणारे आम्हा चौघांचे कुटुंब. घरात मी वगळता कोणीही शाळेचे कधी तोंडही बघितलेले नाही. केवळ आई-वडीलच नाही तर माझ्या दोन बहिणीही कधी शाळेत गेल्या नाहीत. माझ्या शेजार-पाजारची मुले देवसाने गावातील शासकीय आश्रम शाळेत जायची, गावात असलेल्या चौधरी या शिक्षकांना माझ्याविषयी आणि अभ्यासाच्या क्षमतेविषयी विश्वास वाटत होता म्हणून त्यांनीच माझे नाव देवसानेच्या आश्रमशाळेत टाकले. पण त्यासाठी शाळेत गेले होते माझ्या बहिणीचे सासरे, हिरामण मामा. ते शिक्षकांना भेटले आणि परस्पर माझ्या प्रवेशाचे काम करून आले. पण त्यांना माझे नाव मात्र ठाऊक नव्हते त्यामुळे शाळेच्या पटावर माझे नाव लागले ते, टिंब टिंब रामचंद्र झिरवाळ असे! या आश्रम शाळेत शिकवणारे शिक्षक गावातच राहत होते आणि मुख्याध्यापक शिक्षणाविषयी आस्था असणारे, मुलांवर माया करणारे होते. त्यामुळे जेवायला उसळ-भात मिळाला तरी तो पोटभर असायचा. दिवसा शाळा, मग कब्बडी-खो-खो अशा मैदानी खेळांचा दणदणीत व्यायाम आणि रात्री कंदिलाच्या प्रकाशात चार-पाच मित्रांनी एकत्र केलेला अभ्यास, असे ते दिवस होते. शाळेतच नवोदयच्या प्रवेशासाठी आवश्यक ते वर्ग भरायचे. त्या वर्गात माझ्या जणू पुढील प्रवासाचा पाया घातला गेला. खेडगावच्या नवोदय विद्यालयात मला प्रवेश मिळाला आणि एका वेगळ्या शिस्तबद्ध आयुष्याची ओळख झाली. मुलांनी चांगले शिकावे यासाठी लागणाऱ्या सगळ्या सोयी त्या शाळेत होत्या. नवोदयचे अध्यक्ष आणि त्यांची टीम वर्षातून एकदा शाळेला भेट नक्कीच देत असे.

अकरावी झाल्यावर मी नवोदय सोडले कारण एमबीबीएस साठी बारावीचे गुण महत्वाचे असतात हे समजल्यामुळे मला त्यासाठी प्रयत्न करायचा होता. मी जेव्हा बारावीच्या प्रवेशासाठी वेगवेगळ्या कॉलेजमध्ये फिरत होतो तेव्हा मला जाणवले आपल्याकडे शाळा सोडल्याचा दाखलाच नाही. नवोदय मधून हा दाखला मिळणे फार गरजेचे होते मग मी कलेक्टर साहेबाना त्यासाठी भेटायचे ठरवले. त्यांचे ऑफिस

कुठे, ते किती वाजता येतात अशा कोणत्याच गोष्टींविषयी एक चकार शब्दही ठाऊक नव्हता पण शोध घेत तेथे सकाळी अकरापासून जाऊ बसून राहिलो. कलेक्टर साहेबांनी माझी हिम्मत बघून मला पाच मिनिटे वेळ दिला. या धडपडीनंतर मला अखेरीस टाकेदच्या शाळेत बारावीसाठी प्रवेश मिळाला. आणि नवोदयचा दाखला मला घरपोच आला. माझ्या हातात मागील शाळा सोडल्याचा दाखला नसताना मला प्रवेश देणारे टाकेदच्या शाळेचे मुख्याध्यापक नाईकवडे सर यांनी मला शिकता यावे यासाठी जे-जे केले ते आज जरी आठवले तरी मन कृतज्ञतेने भरून येते.

टाकेदला मी खोली घेऊन राहत होतो पण जेवणाचे काय करायचे हा प्रश्न होताच त्यावर नाईकवडे सरांनीच उपाय शोधला. गावात त्या वेळी आदिवासी विकास भवनचे वसतिगृह होते तिथे जे अन्न उरेल त्यातून या मुलाला जेवण द्या असे त्यांनीच सांगितले. गावात त्यांच्या शब्दाला कमालीचा मान होता. त्यामुळे मला सुरळीत डबा येऊ लागला. आणि रविवारी नाईकवडे सरांच्या घरी जेवण्यासाठी येण्याचा त्यांचा आदेश (!) आला. शिवाय त्या वेळी गावात जे काही समारंभ होत, अगदी लग्नापासून-बाराव्याच्या जेवणापर्यंत, सगळीकडे वसतिगृहातील मुले अगदी आमंत्रण असल्याप्रमाणे हजेरी लावत त्यामुळे मीही त्यांच्याबरोबर अशा मिष्टान्न भोजनासाठी जात असे. याचा अर्थ वसतिगृहात जेवण मिळत नव्हते असे नाही तर समारंभात मिळणाऱ्या मिष्टान्न जेवणाचा आम्हाला अधिक मोह असे एवढेच! या काळात मी माझ्या पेक्षा लहान विद्यार्थ्यांना शिकवत असे. अकरावीच्या प्रवेशाप्रमाणे माझ्या बारावीच्या फॉर्मची पण एक कहाणी आहे. नवोदय हे केंद्रीय तर टाकेद ची शाळा राज्य बोर्डाच्या अखत्यारीत, आणि माझ्याकडे मायग्रेशन सर्टिफिकेट नाही, मग काय बारावीचा फॉर्म परत आला. या अणीबाणी मध्ये मदत झाली ती इगतपुरीचे आ.बांबळे यांची, ती भेट घेतली अर्थात सरांच्या मदतीनेच. त्यांना सगळी कहाणी ऐकवली. त्यांनी शिक्षण मंत्र्यांकडून खास ऑर्डर मिळवली ती घेऊन टाकेद च्या शाळेचा क्लार्क पुण्यात गेला त्याने मायग्रेशन सर्टिफिकेट मिळवले ते बोर्डात नेऊन दिले. एवढ्या द्राविडी प्राणायामानंतर अखेरीस, बारावीच्या माझ्या परीक्षेच्या पहिल्या दिवशी सकाळी मला सकाळी माझे हॉल तिकीट मिळाले. मला पहिलीत प्रवेश देणारे चौधरी, पाचवीत आधार देणारे राऊत आणि मग माझे पालकत्व घेणारे नाईकवडे सर माझ्या आयुष्यात नसते तर आज मी कुठे असतो?

माझ्या वैद्यकीय प्रवेशाचे कामही जात पडताळणी अर्ज माझ्याकडे नसल्याने खोळंबले होते. मग पुन्हा आमदार साहेबांची भेट, त्यांनी पुन्हा आदिवासी आयुक्तालयाकडून खास बाब म्हणून आदेश मिळवला. मागास जमातीत मी मुलांमध्ये पाचव्या क्रमांकाने पास झालो होतो. नाशिकमधील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय कॉलेज मध्ये मला प्रवेश मिळाला होता पण त्या प्रक्रियेला सतत स्थगिती मिळत होती. आणि मी वनारे-नाशिक-पुणे अशा चकरा मारून आणि त्यासाठी खर्च करून कंटाळलो होतो. या प्रवासासाठी इतका खर्च झाला की अखेरीस मी कंटाळून घरी गेलो. आता प्रवेश मिळाला असता तरी तो घेण्यासाठी माझ्या खिशात एक रुपया सुद्धा नव्हता. त्यामुळे प्रत्यक्षात जेव्हा प्रवेश प्रक्रिया सुरू होऊन नाशिकमधील वैद्यकीय कॉलेज मध्ये प्रवेश घेण्यासाठी मी गेलो आणि मला २५ हजार रुपये भरण्यासाठी सांगितले गेले तेव्हा माझ्या दोन्ही मुठी रिकाम्या होत्या. त्यावेळी हरिश्चंद्र चव्हाण यांनी माझी डॉ. वसंत पवार यांची भेट घालून दिली आणि डॉक्टरांनी मला गोदावरी बँकेच्या अध्यक्षांची भेट घेऊन २५ हजार रुपयांच्या कर्जाची मागणी करण्याबाबत सांगितले. मी दचकलोच! खिशात एक रुपया नाही आणि मी २५ हजाराचे कर्ज मागत होतो. पण कर्जासाठी अर्ज कर असे सुचवणाऱ्या डॉ. पवार यांनी मला वाऱ्यावर सोडले नाही. त्यांच्या एका फोनने माझे काम सोपे केले आणि त्यानंतर दरवर्षी माझी फी शासनाकडून येईपर्यंत मला ही बँक कर्ज देत गेली. आदिवासी विकास भवनच्या वसतिगृहात त्या वेळी माझा मुक्काम होता. नव्याने येणाऱ्या मुलांचे तेव्हा भरपूर रॅगिंग होत असे पण हीच मुले मग पुढे मित्र होऊन हवी ती मदत पण करायची. एमबीबीएस झाल्यावर मी माझ्याच महाविद्यालयातून भूलशास्त्र विषयातील शिक्षण घेऊन त्याची पदविका मिळवली आणि पहिल्या नोकरीसाठी रोहिले येथे दाखल झालो.

हा सगळा प्रवास खूप शिकवणारा, घडवणारा होता. प्रत्येक टप्प्यावर शासनाने दिलेल्या मदतीमुळे शिकण्याची संधी देणारा होता. अनेक सहृदय माणसांनी केलेल्या मदतीमुळेच मी शिकू शकलो ह्याची जाणीव माझ्या मनात अजून जागी आहे. आणि मला वाटते आहे की आता माझी वेळ आहे, जे मला मिळाले त्याची परतफेड करण्याची. त्या हेतूने मी जिव्हाळा बहुउद्देशीय संस्था सुरू केली आहे. आदिवासी मुलांच्या शिक्षणाचा स्तर वाढावा यासाठी लागणारे सगळे प्रयत्न त्याद्वारे केले जातात. या मुलांबरोबर मला स्वतःलाही माणूस म्हणून, एक व्यावसायिक म्हणून मोठे व्हायचे आहे. लेखन करणे हा माझा अतिशय आवडता छंद आहे. संधी मिळेल तेव्हा आणि तसे मी लेखन करत असतो. माझ्या मोठे होण्याची, स्वतःची ओळख निर्माण करण्याची वाट मला त्यामधूनच तर मिळते आहे.



# आश्रमशाळा ते उपसचिव!

**सुरेश चौधरी**

कोहोरच्या आश्रमशाळेतून माझा शिक्षणाचा प्रवास सुरू झाला. आम्ही खरे मुळचे धनशेतचे! पेठ तालुका पो.कुळवंडी! धनशेतची लोकसंख्या साधारण १५००-१६०० च्या घरात असेल. तिथे शाळाही होती. पण नोकरीनिमित्त आई-वडील कोहोरला आले. आई अंगणवाडी शिक्षिका होती आणि कोहोरच्या शाळेत वडील शिक्षक होते. आम्ही तिघं भाऊ होतो. एक भाऊ आता हयात नाही. शाळा बरीच लांब होती पण लहान वय होतं. घरून शाळेला पायी जाण्यात फार काही वावगं वाटलं नाही. मात्र आईवडिलांना माझी काळजी वाटायची. कारण आमच्या आदिवासी समाजात शिक्षणाला महत्त्व देणारे लोक फारच कमी होते. आजूबाजूच्या पोरांच्या संगतीने मुलाचे लक्ष विचलित झाले तर काय? असा विचार करून मला तिथे आश्रमशाळेत शिकायला पाठवलं. आश्रमशाळा निवासी होती. जुन्या वाड्यासारखी तिची रचना होती. शाळेत मुलंमुली एकत्र शिकायचे पण वसतिगृहात मुलामुलींचे वेगवेगळे भाग होते. तिथले नियम अतिशय कडकपणे पाळले जायचे. दिनक्रमाला शिस्त होती. पण तिथे मुलांची काळजीही घेतली जायची. आम्हाला दररोज पोटभर आणि चांगले जेवण मिळायचे. शाळेत शिक्षकही चांगले होते. सगळे शिक्षक कोहोरचे स्थायिक होते. आम्हा मुलांचे युनिफॉर्म, वह्या पुस्तक यांचा सर्व खर्च शासन करायचे. मी जेव्हा आश्रम शाळेत दाखल झालो तेव्हा आमची पहिलीच बॅच होती. तेव्हा फक्त पहिली व दुसरी एवढेच वर्ग होते. नंतर सातवीपर्यंत शाळा झाली. मी तिथेच पहिली ते सातवी शिकलो. सुरुवातीच्या काळात, इतक्या लहानपणी घरापासून दूर राहण्याचे दुःख मला फार टोचायचे. पण हळूहळू सवय झाली. आणि मी तिथे रुळलो. सगळं सोडून घरी पळून जावं असं कधीच वाटलं नाही, इतका रुळलो! शिवाय सुटीच्या दिवशी घरी जाणं-येणं व्हायचंच.

शाळेत मी हुशार मुलगा म्हणून ओळखला जायचो. तेव्हा सातवीचं केंद्र असायचं. केंद्र परीक्षा पेठला व्हायची. त्याच्यात माझा दुसरा नंबर आला. नाशिकमधील चिंचवडला आदिवासी सेवा समितीचे वसतिगृह होते. तिथे मी प्रवेश घेतला. ८ वी ते १० वी पर्यंत शिक्षण तिथेच घेतलं. आमचं तिथलंही वसतिगृह फार चांगलं होतं. काळजी घेणारी व्यवस्था होती. पण शिक्षणात मात्र जराशी गोम होती. काय होतं, तिथे ९वी, १० वी चे वर्ग एकच शिक्षक घ्यायचे. पाच विषय ते एकटे शिकवायचे. त्यामुळे बोर्डात केवळ पाच मुलेच पास झाली. सुदैवाने मी ५२% मार्कांनी पास झालो.

मी १० वी पास झालो. पुढे काय करायचं याचं काहीच चित्र डोळ्यासमोर नव्हतं. पुढच्या शिक्षणासाठी काय करावं लागतं याची काहीच माहिती नव्हती. तिथे

शासकीय मुलांचे वसतिगृह होतं पण तिथे मर्यादित जागा होत्या. तिथे प्रवेश घेण्यासाठी कोणकोणती कागदपत्र दाखल करावी लागतात याची मी माहिती करून घेतली. त्यात जातीचा दाखला वगैरे बरीच कागदपत्र लागायची. मी खूप धावाधाव करून सगळं जमवलं खरं, पण वेळ लागला आणि वसतिगृहाचा कोटा पूर्ण झाला असल्याने मला प्रवेश मिळाला नाही. वडिलांनी मला वडाळ्याला खोली घेऊन दिली होती. मग मी पंचवटीत हिरे महाविद्यालयात कॉमर्स शाखेला प्रवेश घेतला. माझी वडाळ्याची खोली ते पंचवटी कॉलेज यात १० कि.मी. अंतर होतं. ते रोज पायी जावं-यावं लागायचं. कॉलेज दुपारचं होतं. मी घरीच स्टोव्हवर जेवण बनवायचो आणि डबा घेऊन चालत चालत कॉलेजला निघायचो. रोजच हे अंतर तुडवून पायाचे अक्षरशः तुकडे पडायचे. धावपळ व्हायची, प्रचंड दगदग आणि हालाचे ते दिवस होते. पण वडिलांचा पगार घरीच पुरत नव्हता. ते तरी काय करणार? कसेबसे एक वर्ष काढलं. मग वडिलांनी पैशांची थोडी व्यवस्था करून मला सायकल घेऊन दिली. तरी माझी खोली, जेवणखाण याचा खर्च परवडेनासा झाला. मग १२ वी ला मामाकडे राहायला गेलो. त्यामुळे तो खर्च वाचला. पण सायकलवरूनची येण्याजाण्याची पायपीट चालूच राहिली. खर्चाची तोंडमिळवणी कशी करावी? पैसा कसा उभा करावा? या विचाराने डोक्याला अक्षरशः भुंगा लागायचा. मग मी शनिवार-रविवार अवांतर कामे करायला लागलो. तेव्हा मी विहिरीवर गाळ काढण्याची कामं केली. गवंड्याच्या हाताखाली सिमेंट कालवणे, विटा देणे अशी पडतील ती कामे केली. जिथे बांधकाम असेल तिथे मी जायचो. मला २० रु. रोज मिळायचा. ही गोष्ट ८२-८३ सालातली. माझ्या वर्गात तेव्हा सगळी बागाईतदारांची मुले होती. त्यांच्या हाती सतत पैसा खुळखुळत असायचा. पण त्यांच्यासारखं ऐटबाज राहणं-वागणं, तशी चैन याचं स्वप्न बघायलादेखील मी घाबरायचो. अशी दोन वर्ष मी काम केलं. एफ.वाय.ला तिथेच महाविद्यालयात प्रवेश घेतला. खर्चाचा प्रश्न सोडवण्यासाठी नोकरी करण्याची गरज मला प्रकर्षाने जाणवू लागली. मग दहावीच्याच शिक्षणावर आधारित प्राथमिक शिक्षक पदासाठी माझी मुलाखत झाली आणि मला सिन्नर जिल्ह्यातील तालुका वडगाव पिंगळा इथे प्राथमिक शिक्षकाची नोकरी मिळाली. माझा पहिला पगार होता ८३२ रु. फक्त! नोकरी करून कॉलेजला जाणं कुठलं जमायला? म्हणून मी पुढे बहिस्थ शिक्षण घेतले. त्याच सुमारास कॉलेजमध्ये मला एमपीएससी परिक्षेसंबंधी कळलं. त्या तरुण वयात काहीतरी वेगळं करावं, अधिकारी म्हणून काम करावं अशी उर्मी मनात सतत उसळ्या मारत होती. एमपीएससीची परीक्षा देऊन माझं स्वप्न पूर्ण होईल अशी आशा वाटू लागली. पण परिक्षा देणार कशी? मला काहीच माहीती नव्हती. कोणाचं मार्गदर्शनही नव्हतं. त्या परीक्षेसाठी क्लास असतात हे कळलं. पण क्लासची फी कशी भरणार? पण तिथे मात्र आदिवासी म्हणून सवलत मिळाली. मग काय, वेळ मिळेल तेव्हा क्लास करायचा! असं करत करत एमपीएससीची परीक्षा दिली. पहिल्याच प्रयत्नात मी ती परीक्षा पास झालो. हिरे महाविद्यालयातून बी.कॉम.ची डिग्रीही मिळवली. नंतर ८९ साली साहाय्यक सेल्स टॅक्स अधिकारी म्हणून नेमणूक झाली. जूनमध्ये मंत्रालयात, आदिवासी विकास विभागात साहाय्यक म्हणून नेमणूक झाली. तिथे मी ६ वर्षे काम केलं. तेव्हा मिळणारा २१०० रु. पगार घरी पाठवायचो. आमच्या विभागात दोन स्तरांवर परीक्षा असतात. सेवा आणि पदोन्नती! त्या देऊन नंतर माझी आदिवासी विकास विभागात कक्ष अधिकारी या पदावर बढती झाली. २००८ पर्यंत या पदावर मी कार्यरत होतो.

सन १९९८ मध्ये ए.टी.पवार यांनी आदिवासी विकास मंत्री म्हणून पदभार स्वीकारला. त्यांच्या रूपाने माझ्या करीअरच्या प्रगतीचे दार उघडले. माझी त्यांची भेट झाली. माझी मेहनत करण्याची तयारी, समर्पण वृत्ती त्यांनी जाणली आणि त्यांनी माझी स्वीय साहाय्यक म्हणून निवड केली. माझ्या कामाचा मुख्य भाग म्हणजे मंत्री महोदयांचे दौरे आखणी करणे! तसेच रोजचे काम म्हणजे त्यांच्या मीटिंग्जचे नीट नियोजन करणे, त्यांचे वेळ, ठिकाण ठरवणे. पवार साहेबांना आदिवासींच्या विकासाची मनापासून कळकळ होती. त्यांचे बारीकसारीक गोष्टींवर वैयक्तिक लक्ष असायचे. आदिवासी पाड्यात शाळा, रस्ते व्हावेत यासाठी ते नेहमी आग्रही असत. त्यांच्या काळात आदिवासी विकासाची खूप कामे झाली.

त्यानंतर मी प्रा. वसंत पुरके यांचा स्वीय साहाय्यक म्हणून काम बघू लागलो. ते रोजगार, स्वयंरोजगार व विमुक्त भटक्या जमाती, इतर मागासवर्ग कल्याण खात्यात मंत्री होते. पुढच्या वर्षी शालेय शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी

पदभार स्वीकारला. तेव्हाही मी त्यांच्याचकडे कार्यरत होतो. नंतर मी उद्योग उर्जा कामगार विभागात आणि पुढे सहकार पणन विभागात सचिव पदावर कार्यरत होतो. आता राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नाशिक येथे उपसचिव या अधिकारी पदावर मी काम करतो आहे. माझं हे काम अर्थ न्यायिक स्वरूपाचं आहे. पुढे शिक्षण घेण्याचं माझ्या मनात आहे. पण सध्यातरी वेळेअभावी ते शक्य दिसत नाही.

आदिवासी आश्रमशाळेत शिकताना रोजचा दिवस घालवताना जीव मेटाकुटीला येत होता. त्यातून हा आजचा दिवस मला दिसेल असं वाटलंही नव्हतं. पण या उच्चपदावर काम करण्यासाठी मी पात्र ठरलो याचा मला अभिमान आहे. ज्या आश्रमशाळेने मला घडवलं, त्या आणि तशा आश्रमशाळांना मी भेटी देतो. तिथल्या गैरसोयी सरकारच्या कानावर घालतो. त्या शाळा नीट सुरू राहतील याची काळजी घेतो. आता या शाळांमध्ये मुलांची संख्या वाढतेय. त्यांची प्रगती होते आहे. शिक्षणासाठी जनजागृती करण्यासाठी माझी आता धडपड आहे. गावाकडच्या मुलांना शिक्षणासाठी सर्वतोपरी मी मदत करतो. कारण मला खात्री आहे, त्या मुलांमधूनच पुढे उच्चपदस्थ मानांच्या जागा भूषवणारे जन्मणार आहेत.





# मदतीचे वत्सल हात...

**शीतल भरसठ**

'आपल्या घराण्यात कोणीच आजवर डॉक्टर झाले नाहीय, तू ते शिक्षण घेऊन समाजाची सेवा करावी असं मनापासून वाटतेय...' लहानपणापासून आजोबा, माझ्या आईचे वडील त्यांची इच्छा माझ्यापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करत होते. मी जेमतेम शाळेत जायला लागले तेव्हापासून त्यांची ही इच्छा ऐकत होते. आता जेव्हा मी डॉक्टर होऊन पदव्युत्तर शिक्षणाच्या वाटेवर आहे तेव्हा मागे वळून बघताना मला आजोबांच्या ह्या इच्छेची बीजे माझ्या आईच्या आयुष्यातही स्पष्टपणे दिसतात. माझी आई बारावीपर्यंत शिकलेली आहे आणि वडील एम ए झाले आहेत. आईही आणखी शिक्षण घेऊ शकली असती, कदाचित तिच्या भावाप्रमाणे, म्हणजे माझा मामा लखोजी चौधरी यांच्याप्रमाणे डॉक्टरही होऊ शकली असती पण तशी संधी तिच्या दारापर्यंत कधी आलीच नाही आणि आयुष्यभर तिला ओळख मिळाली ती फक्त 'एक गृहिणी' एवढीच...! ही घटना मला सतत शिकण्याची प्रेरणा देत राहिली. आज, मी शीतल भरसट, केवळ डॉक्टर होण्याचीच नाही तर पदव्युत्तर शिक्षण घेऊन माझ्या समाजासाठी काही करण्याची स्वप्न बघते आहे.

पेठ तालुक्यातील करंजाळीपासून दहा किलोमीटरवर असलेले कोहोर हे आमचे गाव पण वडील राज्य परिवहन महामंडळात नोकरीला असल्यामुळे आम्ही जणू आमचे बिऱ्हाड पाठीवर घेऊन फिरत होतो. माझे प्राथमिक शिक्षण आमच्या गावापासून १७-१८ किलोमीटर दूर असलेल्या कोलम गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत आणि मग पाचवी ते सातवीपर्यंतचे शिक्षण माणजोली गावातील शाळेत झाले. शाळेत मी कधीच पहिला क्रमांक सोडला नव्हता आणि त्यामुळेच माझ्या शिक्षकांना माझ्या पुढील शिक्षणाविषयी काळजी, आस्था वाटत होती. मुलीला चांगल्या शाळेत शिकायला पाठवा असा लकडा त्यांनी माझ्या वडिलांमागे लावला होता. माझे आजोळ कोहोर गावचे, १५०० लोकवस्ती असलेले पेठ तालुक्यातील ते एक मोठे गाव होते त्यामुळे मी अकरावीमध्ये गेल्यावर आमच्या सर्व कुटुंबाने कोहोर मुक्कामी यावे अशी आजोबांची इच्छा होती पण मी पुढील शिक्षणासाठी नाशिकच्या वाटेवर होते. कल्याणमधील सुभेदारवाडा शाळेत माझी दहावी पार पडली, ९२ टक्के गुण मिळवून मी अर्थातच वर्गात पहिली आले होतेच. पण आता मला पुढील शिक्षणाचे वेध लागले होते. माझ्या आईला न मिळालेली संधी आणि घराण्यात पहिली डॉक्टर मुलगी होण्याची इच्छा मनात मूळ धरू लागली होती. त्याच ओढीने मी नाशिकच्या केटीएचएम महाविद्यालयात प्रवेश घेतला. आणि आदिवासी विकास विभागाच्या मेरीमधील वसतिगृहात माझे पहिले स्वतंत्र आयुष्य सुरू झाले.

अकरावीपासून माझ्यासमोर दुहेरी आव्हान होते. एकटीने शहरात राहणे हे तर होतेच पण अकरावी-बारावी बरोबरच मला अखिल भारतीय पातळीवर होणारी वैद्यकीय प्रवेश परीक्षा पार करणे गरजेचे होते. कल्याणमधील कॉलेज मध्ये मला अकरावी-बारावीसाठी प्रवेश मिळत होता. घरापासून दूर असे एकटीने मी राहू नये अशी माझ्या कुटुंबीयांची इच्छा होती पण मी माझ्या निर्णयावर ठाम होते. आणि तसे ठाम राहताना त्यात असलेल्या कसोटीच्या क्षणांची मला जाणीव होती. पहिली कसोटी होती अर्थात भाषेच्या फरकाला ओलांडण्याची. अकरावी-बारावीच्या वर्गात मराठी माध्यमातून शिकलेले जे काही अगदी मोजके विद्यार्थी होते त्यात मी एक. बाकी वर्ग सफाईदारपणे इंग्लिशमधून बोलत असताना मनात अनेकदा न्यूनगंड डोकावत असे पण माझ्या मनातील शिक्षण घेण्याच्या ठाम निर्धाराने त्यावर मात करता आली.

वसतिगृहात बरोबर असणाऱ्या बऱ्याच मैत्रिणी पेठ मधील होत्या. शिवाय शिक्षणासाठी अनुकूल अशा सगळ्या सोयी, जेवण, शैक्षणिक साहित्य सगळे काही शासनाकडून मिळत होते. वसतिगृहाच्या प्रमुख असलेल्या पाटील मॅडमच्या देखरेखीखाली आम्हाला मिळणाऱ्या जेवणाचा दर्जा बघणारी एक कमिटी होती. सगळ्यात महत्वाचे म्हणजे, वसतिगृहात वेगवेगळ्या शाखेत शिक्षण घेणाऱ्या मुली राहत असल्याने माझ्या शिक्षणाखेरीज बाहेर असलेले जग माझ्या समोर येत होते. त्या जगाने आणि माझ्या सागर-मुकेश या मोठ्या भावांनी मला सतत माझ्या ध्येयाच्या मार्गावर सावध ठेवले. त्यामुळे राष्ट्रीय पातळीवरची प्रवेश परीक्षा पार करून मला एमबीबीएस साठी पुण्यात सिंहगड संस्थेच्या काशीबाई नवले वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाला. यंदा मी दुसऱ्या वर्षाची परीक्षा देणार आहे. एमबीबीएस झाल्यावर बालरोगतज्ज्ञ म्हणून अधिक शिक्षण घेऊन काम करण्याची इच्छा आहे.

आज जे शिक्षण मी घेते आहे, ज्या सुविधा मला मिळत आहेत त्या कदाचित कोणत्याच माझ्या वाटेत आल्या नसत्या, जर शासनाकडून मदतीचा हात मिळाला नसता तर..! त्यामुळे मला जे काही मिळते आहे त्याची परतफेड म्हणून जरी नाही तरी माझी त्याबद्दलची कृतज्ञता म्हणून मला समाजाला काही देण्याची इच्छा आहे. शिक्षण पूर्ण झाल्यावर दर शनिवार-रविवारी कोहर गावातील लोकांसाठी वैद्यकीय सेवा देण्याचा माझा मानस आहे. ज्यांनी मला शिक्षण घेण्यासाठी सतत प्रोत्साहन दिले तसे माझ्या पुढील पिढ्यांना देण्याची इच्छा मनात आहे. कारण देणारे हातच अधिक काही मिळवत असतात, सदिच्छा आणि आशीर्वादाच्या रूपाने...






# यशाचा चढता आलेख

**निर्मला गायकवाड**

मी जेव्हा माझ्या आयुष्याकडे बघते, तेव्हा मला ती 'खिडकी' आठवते. मी ज्या होस्टेलमध्ये राहिले, त्या खोलीची खिडकी! मी त्या खिडकीतून बाहेर बघत होते. खिडकीच्या आत होतं, बंदिस्त हाल अपेष्टांचं जग! आणि बाहेरचं मुक्त, स्वातंत्र्याची हवा खेळवत असलेलं सुंदर जग! त्या बंद पिंजऱ्यातून बाहेरच्या जगात मी भरारी मारली आणि उंच जात राहिले. ज्या खिडकीने मला हे बाहेरचं जग दाखवलं, ती खिडकी होती शिक्षणाची! त्यावेळी बिकट परिस्थितीशी लढत असताना, कधी कधी मन अगदी थकून जायचं पण मी त्या खिडकीवरच लिहून ठेवलं होतं, हेही दिवस जातील.

आदिवासी भागात पोटासाठी वणवण आणि फिरस्ती सुरूच असते. असेच माझे आईवडील त्यांच्या लहानपणीच नातेवाइकांबरोबर ओढ्याला आले. पेठ तालुक्यातलं हे गाव. गावच्या पाटलाकडे सालभर त्याच्या शेतात राबू लागले. मालकाकडेच राहायचं, जेवायचं, दिवसभर मजुरी करायची. पुढे त्यातूनच त्या दोघांचे लग्न झाले. मग जिथे काम असेल तिथे जायचं असा फिरता संसार सुरू झाला. विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर! असंच पुन्हा ओढ्याला येऊन स्थिर झाले. मी सगळ्यात धाकटी. मला दोघे मोठे भाऊ आहेत. माझा जन्म ओढ्याचा आणि प्राथमिक शिक्षण ओढ्याच्याच प्राथमिक विद्यामंदिर इथे झाले. दोघा थोरल्या भावांचं शिक्षणात लक्ष नव्हते. मोठा १० वी पास झाला पण धाकट्याने काही १० वीचा उंबरठा ओलांडला नाही. मी पण पहिलीला प्रवेश घेतला खरा, पण पहिले सहा महिने माझं मन काही केल्या तिथे रमेना! अवखळ वय! मग घरी पळून यायचे आणि मला पकडून कोणीतरी पुन्हा शाळेत सोडायचं. हा नित्यक्रमच झाला. पण दुसऱ्या वर्षापासून मात्र अभ्यासाची गोडी लागली आणि दरवर्षी पहिला क्रमांक मिळवत गेले. १ ली ते ७ वी पर्यंत तिथे शिक्षण झाले.

माझी आई फार विलक्षण बाई आहे! अगदी हिंमतवान! तिनेच आम्हाला शिस्त शिकवली. कामाचं वळण लावलं. अभ्यास करण्यासाठी तिने मला जे झोडपून काढलंय, ते अजून माझ्या लक्षात आहे. पण तिच्या मुळेच आम्ही 'शहाणे' झालो हे खरे! मी तेव्हा तिला म्हणायचे, मी असं काम करून पुढे जाईन, तू बघशीलच! आणि मी ते खरं करून दाखवलं.

७ वी नंतर पुढे मी लाखलगावाला गेले. तिथे १० वी पर्यंतच शिक्षण केलं. बुद्धीचं वरदान मिळालं असल्याने शाळेत नेहमीच डिस्टींक्शन मिळत गेलं. परिस्थिती अवघड होतीच पण गुणवत्तेमुळे शिक्षणाच्या सगळ्या वाटा प्रकाशमान झाल्या. त्यात मला हवा असलेला मार्ग लख्ख दिसला.

या सगळ्या धावपळीत, माझ्या आईवडिलांचा

मला भक्कम पाठिंबा होता. त्यांचे ऋण फेडण्यासाठी मला जन्मानुजन्म त्यांची मुलगी होऊन राहावं लागेल. ते पूर्णपणे निरक्षर, सहीच्या जागी अंगठा या वर्गातले! पण त्यांनी माझी कळकळ जाणली. परिस्थितीचा बागुलबोवा माझ्यासमोर उभा करून मला अडवलं नाही. सुशिक्षित कुटुंबातील पुरोगामी विचारांपेक्षा माझ्या निरक्षर आईवडिलांचे विचार प्रगत होते. त्यांनी मला 'मुलगी' म्हणून कमी लेखलं नाही. आमच्या आदिवासी समाजात मुलगा-मुलगी भेद केला जात नाही. उलटपक्षी मुलींना अत्यंत सन्मानाची वागणूक दिली जाते. ही सगळ्यांनीच लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे.

तर आता १० वी झाली, पुढे काय? हा प्रश्न होताच. काहीच माहीत नव्हतं. अनुसूचित जमातीत मोडणाऱ्या वर्गाचे फायदे काय मिळतात हेही माहीत नव्हतं. काही म्हणे, 'शिक्षिका हो!' मला विज्ञान शाखेत प्रवेश घ्यावा वाटत होतं. इथेही माझ्या आईवडिलांनी ठामपणे सांगितलं, 'तुला हवं ते तू कर.' असं सुसंस्कृत स्वातंत्र्य किती घरातून मिळत असेल? मग मी नाशिकच्या केटीएचएम कॉलेजला प्रवेश घेतला आणि मग जी दगदग सुरू झाली की काय सांगू? पहाटे पाच वाजता ओढ्याहून निघायचे ते रात्री ११ वाजताच परत घरी यायचे. या दमणूक करणाऱ्या वेळापत्रकातून सुटका करण्यासाठी मेरी येथील वसतिगृहावर राहायचे मी नक्की केले. घरी एकच मुलगी म्हणून लाडाकोडात वाढलेली मी, वसतिगृहावर राहणं जमेल का? पण मला नक्की कळलं होतं, या लाडाकोडाचा पुढच्या आयुष्यात काय उपयोग? माझं भविष्य इथेच घडणार आहे. मग मी वसतिगृहात राहायला आले. १००-१५० मुली होत्या. मेस होती. शासकीय खर्चाने वह्या पुस्तकं, जेवणखाण मिळत होतं. २०० रु. भत्ता मिळत होता.

शिक्षण सुरळीत सुरू झालं. मेडिकलला जाण्याची माझी इच्छा होती पण परिस्थितीमुळे ते शक्य नव्हतं. तेव्हाच मला आयुष्याला एक नवीन वळण देणाऱ्या एमपीएससी परिक्षेविषयी कळलं. वाचणामधून त्या परिक्षेविषयी माहिती मिळाली. तर काहींच्या बोलण्यातून कळली. एमपीएससीची तयारी सुरू करण्याचं मी मनात नक्की केलं. आदिवासी विकास विभागाने 'करीअर अकॅडमी' या क्लासशी करार केला होता. त्या क्लासच्या सरकार सरांना मी भेटायला गेले. त्यांच्याशी बोलले, त्यांनी मार्गदर्शन केलं. माझी गुणवत्ता ओळखून मला मनापासून मदत केली. त्यांच्या सल्ल्यानुसार एस.वाय.ला असतानाच मी एमपीएससी चा अभ्यास सुरू केला आणि टी.वाय.ला असताना त्याची पूर्वपरीक्षा दिली. मी एकपाठी आहे. त्यामुळे ही अवघड परीक्षा मी सहज उत्तीर्ण झाले. सरकार सरांनी विश्वास दिला. वाचनालयातील सगळी पुस्तकं वापरायची मुभा दिली. पण टी.वाय. पूर्ण केल्याशिवाय एमपीएससीची मुख्य परीक्षा देता येत नव्हती. म्हणून मी केमिस्ट्री विषय घेऊन बी.एस्सी. पूर्ण केलं. त्यातही डिस्टिंक्शन मिळून मी एम.पी.एस.सी. ला प्रवेश घेतला. मुख्य विषय होता ऑरगॅनिक केमिस्ट्री! त्यासाठी फी जास्त होती. माझ्या आईवडिलांनी त्यासाठी व्याजावर पैसे घेऊन ठेवले होते. पण त्याची गरज पडली नाही. सरकारनेच तो खर्चाचा भार उचलला. झालं! पुन्हा माझी धावाधाव सुरू झाली. पहाटे ५ वाजता दिवस सुरू व्हायचा. दिवसभर कॉलेज, संध्याकाळी ६ ते ८ एमपीएससी ची बॅच! ते दिवस म्हणजे फक्त अभ्यास-अभ्यास आणि अभ्यास! एम.एस्सीच्या दुसऱ्या वर्षी एमपीएससीची मुख्यपरीक्षा मी यशस्वीरीत्या पास झाले. शिवाय एम.एस्सी.ला पण पहिला वर्ग मिळाला. एमपीएससी ला विषय होते भूगोल आणि होम सायन्स! साल होतं २००९! आयुष्याची ही लढाई मी जिंकले. माझे अथक परिश्रम फळास आले.

माझी पहिली नेमणूक भगूरला झाली तेव्हा माझं वय होतं फक्त २३! भगूर हे राजकीय दृष्ट्या संवेदनशील मानले जाते. परिस्थिती अडचणीची होती खरी, पण माझ्या स्वभावातच हार मानणे बसत नाही! मी कणखरपणे सर्व परिस्थिती हाताळून अनेक योजना राबवल्या. सगळ्यात महत्त्वाची योजना होती- घर उपलब्धीसाठी १० कोटींची मंजुरी मिळवली! माझी बदली झाल्यावर ती योजना बंद पडली हे दुर्दैव! पण मी माझं काम चोख केलं. लोकांचा खूप मान, प्रेम मिळालं. याचं मला समाधान आहे. नंतरची नेमणूक नांदगावला झाली. जिथे आता मी मुख्याधिकारी-नगरपरिषद या हुद्यावर कार्यरत आहे.

माझं ध्येय फक्त अधिकारी बनण्याचं होतं. या पदाला एवढं महत्त्व, मान आहे हे मला माहीतच नव्हतं. आधी मला तुच्छ लेखणारे लोक कौतुक करताना थकत नाहीत. माझ्या घरची परिस्थितीही आता सुधारली आहे. इंदिरा आवास योजनेत आईवडिलांना घर मिळालं आहे. ते तिथे भाजीपाल्याचा व्यवसाय करतात. दोघेही भाऊ

मुक्तविद्यापीठातून पदवी मिळवून कष्ट करत आहेत. आपल्या शिकलेल्या बहिणीचा त्यांना फार अभिमान आहे. तिथल्या गावकऱ्यांनी घरी येऊन माझा सत्कार केला तेव्हा आम्हा सगळ्यांना भरून पावलं.

माझा पुढचा टप्पा डेप्युटी कलेक्टरची परीक्षा पास होण्याचा आहे. आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्री–अधिकारी म्हणून काम करताना मर्यादा येतात पण ज्या खुर्चीत मी बसले आहे त्याचा मान ठेवलाच पाहिजे, याबद्दल मी फार दक्ष असते. माझी निर्णयक्षमता या पदापर्यंत मला घेऊन आली. माझ्या आईवडिलांसाठी हे सगळं आहे. आता मी सामाजिक ऋण फेडण्यासाठी जातपात न बघता लोकांसाठी मनापासून काम करणार. आमच्या आदिवासी बांधवांची प्रगती आणि विकासासाठी मी कटिबद्ध आहे.

